नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०४/२०२६ (बुधवार )**

---

# नागपूर जिल्हयातील वाढत्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर नागपुर ग्रामीण पोलीसांची तयारी

सध्या उन्हाळा सुरू झाला असुन पोलीसांना त्यांचे कर्तव्य बजावतांना कित्येक तास उन्हात फिराव लागते किंवा उभे राहवे लागते. यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रभाव पडण्याची शक्यता आहे. ही बाब गंभीर असुन वाढत्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर परीस्थितीची दखल मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना खालील प्रमाणे विशेष सुचाना दिल्या आहे.

त्या अनुषंगाने सर्व पोलीस स्टेशनमध्ये अधिकारी/अंमलदार तसेच पोलीस स्टेशनमध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची (वॉटर डिस्पेंसर) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्व पोलीस स्टेशनमध्ये केळी व हायड्रेटिंग इलेक्ट्रोल (Electral) उपलब्ध करून देण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार ज्यूस किंवा फळांचे स्टॉल लावण्यासही परवानगी देण्यात आली आहे. उष्णतेपासून बचावासाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी कूलर बसविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, पर्यावरणाची काळजी घेत पोलीस स्टेशन परिसरात तसेच इतर योग्य ठिकाणी पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची भांडी ठेवण्याचे तसेच परिसरातील झाडे व रोपे कोमेजू नयेत यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याचे निर्देश मा. पोलीस अधिक्षक यांनी दिले. सर्व प्रभारी अधिकारी यांनी सुचनांची पुर्तता केली तसेच सर्व सुविधा पोलीस स्टेशनला उपलब्ध करण्यात आल्या.

मा पोलीस अधिक्षक यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना उन्हापासुन स्वत:ची काळजी घेवुन सुरक्षीतता बाळगुन कर्तव्य करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.




पोलीस
दुरध्वनी क्रं:


ऑक्वा






CABLES • SWITCHES • SWITCHGEARS
FANS • LIGHTING • APPLIANCES



## नागपुर ग्रामीण जिल्हयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती बंदोबस्त यशस्वीरित्या आणि शांततेत पार पडला.

दिनांक १४/०४/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठया प्रमाणात सर्वत्र साजरी करण्यात आली. मिरवणुका, शोभायात्रा ,व्याख्यानमाला, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात एकुण ३५२ मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला होता.

जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त आखला होता. सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी आपआपल्या उपविभागात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत सतर्क पेट्रोलीग केली तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी/अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडले. जिल्हयात ६ उपविभागात ६ उपविभागीय पेट्रोलींग पथक आणि संपुर्ण परीसरात १ पेट्रोलींग पथक नेमण्यात आले होते. दंगानियंत्रण २ पथक, राज्य राखीब दलाचे २ प्लाटुन , गृहरक्षक यांचा सुध्दा बंदोबस्तामध्ये समावेश होता. विशेष ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले होते. **सर्वांना नेमुन दिलेले कर्तव्य त्यांनी काटोकोरपणे पार पाडल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती बंदोबस्त शांततेत आणि यशस्वीरित्या  पार पडला.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनामधील ०८ गोवंश जनावरांची सुटका, पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक १५/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कुही फाटा, दर्शन बार जवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/बी एल—२०२३ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **चालक नामे भुषण मारोती साव, वय २९ वर्ष, रा. विरली, ता. उमरेड, जि. नागपूर** हा मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—४०/बी एल—२०२३ किंमती ५,५०,०००/—रूपये आणि ८ गोवंश जनावरे किंमती ८०,०००/—रूपये असा एकुण ६,३०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी वाहन चालक आरोपी भुषण मारोती साव, वय २९ वर्ष, रा. विरली, ता. उमरेड, जि. नागपूर यांचेविरूध्द कलम ११(१), (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम १८४ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ३० लाख ३५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १४/०४/२०२६ रोजी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन वडोदा हद्दीत मौजा कढोली शिवार, गणेश पेट्रोल पंप जवळ,नाकाबंदी केली असता नागपुर ते भंडारा रोडने येत असलेल्या १६ चक्का ट्रक क्र. एम. एच— ४० टी — ८६६५ या वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक आरोपी क्रं १) नामे सलित सुलेमान खान, वय २३ वर्ष, रा. अमेरती, ता. गुड, जि. रिवा, राज्य मध्यप्रदेश ह. मु. कारंजा (लाड), जि. वर्धा हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. वाहन चालकास मालकाचे नाव विचारले असता आरोपी क्रं २) मालक नामे अब्दुल रहमान अब्दुल रोफ चौस, वय ३९ वर्ष, रा. कारंजा (लाड) जि. वर्धा याचे सांगणेवरून रेती भरून नेत असल्याची माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद** १६ चक्का ट्रक क्र. एम. एच— ४०/टी — ८६६५ **किंमती ३०,००,०००/— रूपये २) ०७ ब्रास रेती किंमती ३५,०००/— रूपये असा एकुण ३०,३५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक आणि मालक आरोपींविरूध्द पोस्टे वडोदा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८), महा. जमीन महसुल अधि. कलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त, पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक १४/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ उंदरी बस स्टॉप कुही येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो पॅशन मोटरसायकल क्र. एम एच—३१/डी एम— ९०८६ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता सदर मोटरसायकलचे दोन्ही बाजूला दोन हिरव्या रंगाचे कापडी पिशवीत देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे संजय कुंजनलाल जैस्वाल, वय ५५ वर्ष, रा. उंदरी, ता.**

**उमरेड, जि. नागपूर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २०० निपा  किंमती ८०००/— रूपये,** हिरो पॅशन कंपनीची मोटरसायकल क्र. एम एच—३१/डी एम— ९०८६ **किंमती ३५,०००/—रू असा एकुण किंमती ४३,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन पाचगाव येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन नरखेडः—** दिनांक १४/०४/२०२६ **रोजी** नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी उदयभान संतोष देहारे, वय ४८ वर्ष, रा. बानोर, ता. नरखेड, जि. नागपूर हा** मौजा खरसोली ते नरखेड रोड रेल्वे उडाण पुलाजवळ खरसोली शिवार **येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून** सेवन करतांना मिळुन आला. तसेच आरोपी संजय जाणबाजी कुंमरे, वय ४५ वर्ष, रा. बानोर, ता. नरखेड, जि. नागपूर **हा** मौजा माणीकवाडा गोंडेगाव रोड शिवार **येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून** सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन. डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**